**फेब्रुवारी  महिन्यात करावयाची शेतीची कामे – (पुणे जिल्हा)**

**पुर्वहंगामी उस** – पीक १२ ते १६ आठवड्याचे झाले असल्यास बांधणीचेवेळी १३६ किलो नत्राचा (३०० किलो युरीया) चौथा हप्ता द्या. पालाश व स्फुरद खतांचा प्रत्येकी ८५ किलोचा (सुपर फॉस्फेट ५३४ किलो व म्युरेट ऑफ पोटॅश १४० किलो) हप्ता द्या. काणीग्रस्त व गवताळ बेटे आढळून आल्यास अशी बेटे खोदून काढून त्यांचा संपुर्ण नायनाट करा.

जमिनीच्या मगदुराप्रमाणे १२ ते १५ दिवसांनी नियमीत पाण्याच्या पाळ्या द्या. पाणी पुरवठा कमी असल्यास जमिनीतून होणारे पाण्याचे बाष्पीभवन कमी करणेसाठी प्रती हेक्टरी ५ ते ६ टन पाचट जमिनीवर पसरावे. तसेंच पाण्याची बचत करणेसाठी एक आड एक सरीत पाणी द्यावे.

**खोडवा ऊस** – ऊस तोडणी झाल्यानंतर लगेच धारदार कोयत्याने ऊसाचे बुडखे जमिनीलगत छाटून घ्यावेत. त्यानंतर नांगराने बगला फोडून पाचट गाडावे. नंतर पहिल्या पाण्याचे पाळीबरोबर हेक्टरी ७५ किलो नत्र + ११५ किलो स्फुरद + ११५ किलो पालाश (१६५ किलो युरिया + ७२० किलो सुपर फॉस्फेट + १९० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे. वरील सर्व कामे ऊस तोडणीनंतर १५ दिवसांच्या आत पुर्ण करावीत.

ऊस तोडणीनंतर ६ ते ८ आठवड्यानी ७५ किलो नत्राचा (१६५ किलो युरीया) दुसरा हप्ता द्या व बांधणीच्यावेळी हेक्टरी १०० किलो नत्राचा (२१५ किलो युरिया) तिसरा हप्ता द्या.

टीप – पंधरा फेब्रुवारीनंतर तोडलेल्या ऊसाच्या खोडवा ठेवू नका. ठेवल्यास खोडकीडीचा प्रादुर्भाव वाढून उत्पादनात मोटी घट येते.

**सुरू ऊस** – सूरू ऊसाची लागण होऊन ६ ते ८ आठवडे झाले असल्यास हेक्टरी १०० किलो नत्राचा (१२० किलो युरिया) दुसरा हप्ता द्या. नत्र युरीया खतामधून द्यावयाचा असल्यास त्यावर निंबोळी पेंडीच्या बारीक भुकटीची प्रक्रीया करा. ६ किलो युरियास १ किलो निंबोळी पेंड या प्रमाणात मिश्रण करा. निंबोळी पेंडीचा वापर नत्राचा दुस-या व चवथ्या हप्त्याच्यावेळी करावा. निंबोळी पेंडीच्या वापरांमुळे नत्र खतात बचत होऊन पिकास नत्र गरजेनुसार उपलब्ध होते. (सुरू ऊसाच्या सविस्तर लागवडीनंतर माहे जानेवारी २००६ च्या कृषि संदेशाचे अवलोकन करावे.)

खोडकीडीच्या नियंत्रणासाठी –

१) हेक्टरी २५ कामगंध सापळे शेतात लावावेत.

२) खोडकीडग्रस्त ऊस उपटून अळीसह नष्ट करावा.

३) हेक्टरी ४ फुले ट्रायकोकार्ड १० दिवसाच्या अंतराने ५ वेळा लावावीत.
४) दाणेदार सेव्हीडॉल २५ किलो अथवा क्लोरोपायरीफॉस २० किलो प्रति हेक्टरी जमिनीतून द्यावे नंतर हलकेसे पाणी द्यावे.

**ऊसावरील पांढरा लोकरी मावा** –
ऊसावरील पांढरा लोकरी मावा नियंत्रणासाठी एन्डोसल्फान ३५ टक्के ५०० मि.ली. + मेटॅसिस्टॉक १००० मि.ली. आणि ५०० मि.ली. स्टीकर अथवा ५ किलो डिटर्जंट पावडर ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टरी फवारणी करावी. ही किड मुख्यत्वेकरून पानाच्या खालील बाजूस दिसून येते. त्यामुळे किटकनाशकाची फवारणी करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. त्यानंतर १५ दिवसांनी क्रायसोपर्ला अथवा डिफा अथवा मायक्रोमास या परभक्षक किडीच्या २५०० अळ्या प्रतिहेक्टरी ऊसावर सोडाव्यात म्हणजे लोकरी मावा किडीचे जैविक पध्दतीने नियंत्रण होईल अथवा एन्डोसल्फान ३५ टक्के ५०० मिली. + अँसीफेट ७५ टक्के पाण्यात मिसळणारी १००० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रतीहेक्टरी फवारावे.

**रब्बी पिके** –

**हरभरा** –
हरभ-यावरील घाटे आळीच्या नियंत्रणासाठी एच.एन.पी.व्ही. या विषाणूचा अवलंब करावा. एच.एन.पी.व्ही. या विषाणूमुळे शेतात अळ्या रोगट बनतात. त्यामुळे त्यांची वाढ न होता त्या मरतात. अशा ५०० रोगग्रस्त अळ्या पाण्यात ठेचून त्याचे द्रावण फडक्यातून गाळून प्रतिहेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारणी करावी. एन.पी.व्ही. ची फवारणी अळी लहान अवस्थेत असतानाच करावी. अळी मोठी झाल्यानंतर फवारणी केल्यास फारसा उपयोग होत नाही. प्रखर सुर्यप्रकाशामुळे औषधाची तीव्रता कमी होते. त्यामुळे फवारणी दुपारी ३ ते ४ वाजेनंतर करावी. पहिली फवारणी अळ्या दिसू लागताच करावी. व दुसरी फवारणी १५ ते २० दिवसांनी करावी किंवा पहिल्या फवारणीनंतर १५ ते २० दिवसांनी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. पक्षांद्वारा अळ्यांचे नियंत्रण करणेसाठी शेतात ठिकठिकाणी मचाण उभारावे. कामगंध सापळे ५ प्रती हेक्टरी लावावेत. घाटे अळीच्या नियंत्रणासाठी एन्डोसल्फान ३५ इ.सी. १००० मि.ली. किंवा क्विनॉलफॉस (इकॅलक्स) २५ इ.सी. १००० मि.ली. ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रतीहेक्टरी फवारावे किंवा एन्डोसल्फान ४ टक्के भुकटी किंवा मॅलेथिऑन ५ टक्के भुकटी किंवा क्विनॉलफॉस १.५ भुकटी प्रतीहेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावी.

**सुर्यफूल** –

करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास मॅन्कोझेब (एन्डोफील एम ४५) १५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून हेक्टरी ५०० लिटर या प्रमाणात फवारावे.

सुर्यफुलावरील केसाळ अळीच्या नियंत्रणासाठी एस.ओ.एन.पी.व्ही. ५०० एल.ई. अथवा ५ टक्के निंबोळी अर्क अथवा एन्डोसल्फान ३५ इ.सी. १००० मि.ली. किंवा क्विनॉलफॉस २५ इ.सी. १००० मि.ली. प्रतीहेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. किडींचे अंडीपुंज, अळ्या गोळा करून नाश करावा. मॅलेथिऑन ५ टक्के किंवा कार्बारील १० टक्के भुकटी हेक्टरी २५ किलो या प्रमाणात धुरळावी.

**गहू** –

तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास मॅन्कोझेब ७५ टक्के १५०० ग्रॅम अधिक ५०० लिटर पाणी या द्रावणात १० किलो युरीया मिसळून प्रतीहेक्टरी फवारणी करावी.

**करडई** –

करडईवरील मावा किडीच्या नियंत्रणासाठी क्रायसोपर्ला कार्निया या परभक्षक किडीच्या १० ते १५ हजार अळ्या प्रतिहेक्टरी सोडाव्यात अथवा व्हर्टीसिलीयम लिकयानी ४ ग्रॅम प्रती लिटर पाण्यातून फवारावे. अथवा एन्डोसल्फान ३५ इ.सी. ७०० मि.ली. किंवा डायमेथोएट रोगार ३० इ.सी. ५०० मि.ली. प्रतीहेक्टरी ५०० लिटरी पाण्यात मिसळून फवारावे. किंवा कार्बारील १० टक्के भुकटी किंवा एन्डोसल्फान ४ टक्के भुकटी हेक्टरी २० किलो या प्रमाणात धुरळावी.

**उन्हाळी पिके** –

**भुईमूग** – पेरणी १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करावी. पेरणी वाफश्यावर करावी.

१) प्रकार – उपटया

पेरणी अंतर – ३० X १० से.मी.

बियाणे – १०० ते १२० किलो प्रती हेक्टर

२) प्रकार – निमपस-या

पेरणी अंतर – ३० X १५ सें.मी.

बियाणे – ८० ते ९० किलो प्रतीहेक्टर

३) प्रकार - पस-या

पेरणी अंतर – ४५ X १० सें.मी.

बियाणे – ७० ते ८० किलो प्रतीहेक्टरी

पेरणीपुर्वी एक किलो बियाण्यास २.५ ग्रॅम या प्रमाणात कार्बेन्डॅझिम किंवा बुरशीनाशक अथवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा बुरशानाशक प्रतिकिलो याप्रमाणे वापरून प्रक्रिया करावी. त्यानंतर बियाण्यास २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे या प्रमाणात रायझाबियम + स्फुरद विरघळणारे जिवाणूसंवर्धनाची बीजप्रक्रीया करावी.
रासायनिक खते – हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद संपुर्ण पेरणीच्यावेळी द्यावे + १२५ किलो जिप्सम पेरणीच्यावेळी व १२५ किलो पेरणीनंतर ३० दिवसांनी द्यावे.
सुधारीत वाण – सुधारीत वाणांचा वापर करा. पेरणीसाठी एस.बी.११, टी.ए.जी.२४, टी.जी.२६, आय.सी.जी.एस.११, एम.१३, टी.पी.जी.-४१ अथवा कोयना यापैकी वाणाची निवड करावी.

**सूर्यफूल** –
पेरणी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण करा.
पेरणी अंतर – ६० X ३० सें.मी. (भारी जमिन)
४५ X २२.५ सें.मी. (मध्यम जमीन)
बियाणे – हेक्टरी १० किलो
पेरणीपूर्वी बियाण्यावर अँझोटोबॅक्टर २५० ग्रॅम व स्फुरद विरघळविणारे जीवाणू २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाण्यावर बिजप्रक्रीया करावी.
रासायनिक खते – ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद व ३० किलो पालाश प्रतीहेक्टरी द्यावे. अर्धे नत्र व संपुर्ण स्फुरद व पालाश पेरणीच्यावेळी द्यावे व अर्धे नत्र ३० दिवसांनी द्यावे.
सुधारीत वाण – ई.सी.६८४१४, मॉर्डेन, एस.एस.५६
संकरीत वाण – के.बी.एस.एच.११, ए.पी.एस.एच.११

**उन्हाळी बाजरी** –
उन्हाळी हंगामातील ढगविरहीत स्वच्छ हवामान, भरपूर सूर्यप्रकाश व पिकाच्या वाढीस योग्य तापमान व हवामानाचे इतर घटक उन्हाळी हंगामात बाजरी पिकावर किड व रोगाचा प्रादुर्भाव होत नाही. त्यामुळे उन्हाळी हंगामातील बाजरीचे उत्पादन (धान्य व चारा) खरीप हंगामापेक्षा सव्वा ते दिडपटीपेक्षा जास्त येते म्हणून ज्या ठिकाणी उन्हाळ्यात सिंचनासाठी पाण्याची सोय ५-७ पाण्याच्या पाळीचे सोय असेल अशा ठिकाणी उन्हाळ्यात बाजरीची लागवड करणे खूप फायदेशीर आहे. त्यासाठी पुढील तांत्रीक बाबींचा अवलंब

करून उन्हाळी बाजरीची लागवड करावी.

१) उन्हाळी बाजरीच्या लागवडीसाठी मध्यम ते भारी खोलीची, पाण्याचा उत्तम निचरा असणारी जमीन निवडावी.

२) जमिनीची पूर्वमशागत करताना १५ सें.मी. खोलीपर्यंत १ नांगरट व कुळवाच्या दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी.

३) जमिनीत असलेल्या पूर्वीच्या पिकाची धसकटे, हरळी, कुंदा यांच्या काड्या वेचून जमीन स्वच्छ करावी.

४) दुस-या कुळवणीअगोदर हेक्टरी ६ ते ७.५ टन (१२ – १५ बैलगाड्या) शेणखत अथवा कंपोस्ट खत शेतात पसरून टाकावे व दुस-या कुळवाच्यावेळी ते जमिनीत चांगले मिसळावे.

५) पेरणी – उन्हाळी हंगामातील बाजरीची पेरणी जानेवारीचा दुसरा पंधरवडा ते फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यत पूर्ण करावी.

६) वाण – पेरणीसाठी महात्मा फुले कृषि विद्यापिठाने प्रसारीत केलेल्या श्रध्दा व सबुरी या संकरीत वाणाचा वापर करावा.

७) बियाणे – हेक्टरी ३-४ किलो प्रमाणीत बियाणे वापरावे. पेरणीपुर्वी बियाण्यास अँझोस्पीरीलम हे जिवाणूखत १०० ग्रॅम प्रती ४ किलो बियाण्यास चोळून बिजप्रक्रीया करावी. त्यामुळे नत्रात २० ते २५ टक्के बचत होते. पेरणी करणेपुर्वी शेत ओलवून वापसा आल्यावर पेरणी करावी. पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी. म्हणजे बी व खत एकत्र पेरता येते. ३० सें.मी. अंतराची पाभर वापरावी. उगवणीनंतर ८ ते १० दिवसांनी विरळणी करून दोन रोपातील अंतर १५ सें.मी. ठेवावे म्हणजे हेक्टरी दोन लाख वीस हजार रोपे एक हेक्टर क्षेत्रात राहतात. पेरणीच्यावेळी हेक्टरी ४५ किलो नत्र, ४५ किलो स्फुरद व ४५ किलो पालाश उन्हाळी बाजरी पिकास द्यावे. नत्र खताचा दुसरा हप्ता पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी यरिया खताद्वारे हेक्टरी ४५ किलो याप्रमाणे द्यावा. पेरणीनंतर पिकास ३-४ दिवशी पहिले पाणी द्यावे. त्यानंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे १०-१२ दिवसाचे अंतराने ५-७ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

अंतरमशागत – तणांचा बंदोबस्त करणेसाठी दोन वेळा खुरपणी देऊन पीक पेरणी केल्यापासून ३० दिवसापर्यंत तणविरहीत ठेवावे.

**फळबाग व भाजीपाला** –

**आंबा, नारळ** – जानेवारी महिन्यात दिलेले १ ते ८ संदेशाचे अवलंबन करा. नवीन लागवड केलेल्या आंबा किंवा नारळाचे उन्हापासून संरक्षण करा. आंब्याच्या मोहोराचे तुडतुडे व भुरी

रोगापासून संरक्षण करण्यासाठी ५० टक्के वेटेबल कार्बारील २० ग्रॅम + ८० टक्के वेटेबल गंधक २० ग्रॅम किंवा ३५ टक्के एन्डोसल्फान (प्रवाही) १५ मि.ली. + १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम दहा लिटर पाण्यास या प्रमाणात घेऊन मोहोरावर व झाडांच्या शेंड्यावर फवारावे. बागेतील मोहोर न आलेल्या झाडावरही औषध फवारणी करावी.

मोहोराची फुलगळ थांबविण्यासाठी व फळधारणा वाढविण्याकरीता मोहोरावर १० पी.पी.एम.एन.ए.ए. ह्या संजिवकाचा फवारा द्यावा. फळांची गळ कमी करण्यासाठी फळांचा आकार वाटाण्याएवढा झाल्यावर (०.५ सें.मी.) व द्राक्षमण्याएवढा (१ सें.मी.) झाल्यावर २० पी.पी.एम. तीव्रतेचे एन.ए.ए. या संजीवकाचे दोन फवारे द्यावेत.

**कलिंगड** – कलिंगडाच्या चांगल्या उत्पादनासाठी व चांगल्या प्रतीसाठी प्रत्येक वेलीवर २ ते ३ फळे ठेवावीत.

**डाळींब** – डाळींब पिकाच्या वर्षातून एकच बहार घ्यावा. उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता असल्यास चांगल्या व दर्जेदार फळांसाठी आंबेबहार घ्यावा. अपुरा पाणीपुरवठा असल्यास मृग किंव हस्त बहार घ्यावा. डाळींबाची कलमे रोग असलेल्या झाडावर बाधू नयेत. कलमे बांधणेसाठी निरोगी झाडे निवडावीत. डाळींबाच्या चांगल्या प्रतीसाठी फळांची संख्या मर्यादित ठेवणे आवश्यक आहे. ५ ते ७ वर्षाच्या झाडावर ६ ते ८ डझन फळे घ्यावीत. विरळणीसाठी घोसामधील जादा फळे, रोगट व किडग्रस्त फळे काढून टाकावीत. पूर्ण वाढलेल्या बागेतून १० ते १२ टन उत्पादन मिळते. प्रत्येक पूर्ण वाढलेल्या झाडास ४ ते ५ घमेली शेणखत ३२५ ग्रॅम नत्र, २५० ग्रॅम स्फुरद अधिक २५० ग्रॅम पालाश ही खते झाडास बहार धरणेच्यावेळी द्यावीत. एक ते दिड महिन्यानंतर आणखी ३०० ग्रॅम नत्र द्यावे. निंबोळी पेंडीचा वापर करा.

**उन्हाळी भाजीपाला** – कांदा, मिरची, वांगी, भेंडी, कारली, दोडका, दुधी, टरबूज, काकडी, गवार या उन्हाळी भाजीपाल्याच्या लागवडी पूर्ण कराव्यात.

**पशूसंवर्धन व दुग्धशास्त्र** –

**म्हशीचे शास्त्रोक्त संगोपन** –

आपल्या एकूण दुध उत्पादनात म्हशींच्या दुधाचाही मोठा वाटा आहे. निकृष्ट प्रतीच्या चा-याचे उत्तम प्रतीच्या दुधात रुपांतर करणेची क्षमता म्हशींमध्ये अधिक असल्याने सध्या अधिक दुग्धात्पादनासाठी म्हशी पाळणे किफायतशीर आहे. म्हणून म्हशींचे संगोपन चांगल्या रीतीने करणेची गरज आहे. दुध उत्पादनाशिवाय मांसोत्पादन व ओढकामासाठीसुध्दा म्हशींच्या किंवा रेड्यांचा वापर केला जातो.

**म्हशींच्या जाती –**

१) मु-हा (दिल्ली) – उत्तर भारतात तसेंच महाराष्ट्रात ही जात आढळते. शरीर बांधा मोठा, भारदस्त व कणखर असतो. एका वेतातील दुधाचे प्रमाण १८०० ते २००० लिटर असते.

२) मेहसाणा – ही जात सुरती व मु-हा जातीच्या संकरापासून निर्माण झाली असून शरीरवैशिष्ट्ये मु-हा जातीशी मिळतीजुळती आहेत. या म्हशी एका वेतात सरासरी २००० लिटर पर्यंत दूध देतात.

३) पंढरपुरी – सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगाव या ठीकाणी प्रामुख्याने आढळतात. या म्हशी आकाराने मध्यम पण अतिशय काटक असतात. लांब व निमुळता चेहरा, खांद्यापर्यंत पोहोचणारी लांब व पिळवटलेली शिंगे हे त्यांचे वैशिष्ट्य. म्हशींचे वजन साधारण ४०० किलो व रेड्याचे वजन ५०० किलो असते. पारड्या वयाच्या २५ ते ३० महिन्यात गाभण राहतात आणि ३५ ते ४० महिन्यात गाभण राहतात आणि ३५ ते ४० महिन्यात पहिल्यांदा वितात. मध्यम शरीर, लवकर वयात येणा-या पारड्या, कमी भाकडकाळ, पहिल्या वेताचे कमी वय, उत्तम प्रजोत्पादन व दुग्धोत्पादन क्षमता आणि दुग्धात्पादनाचे सातत्य या गुणांमुळे दुधासाठी ही जात चांगली आहे. हे सर्व गुण एकत्रितपणे इतर जातीत आढळत नाहीत. या म्हशी एका वेतात १५०० ते १८०० लिटर दूध देतात.

४) सुरती – शरीरबांधा मध्यम, कान लांबट, रुंद व शिंगोनी झाकलेले असतात. भुवयाचे केस पांढरे, डोळे मोठे व शिंगे मध्यम व विळ्यांच्या आकारांची असतात. शरीराचा रंग भुरा व मानेवर ठळक पांढरे आडवे पट्टे असतात. एका वेतातील दुधाचे उत्पादन १८०० लिटर असते. जास्त काळ दुध देते व दुधात स्निग्धांश जास्त असतो.

**म्हशींची पैदास –**

म्हशींचे प्रजोत्पादन करणेसाठी शुध्द जातीचा व उत्तम प्रतीचा रेडा निवडावा. लवकर गाभण राहणा-या व जास्त दुध देणा-या म्हशींपासून पैदा झालेला वळू निवडावा व त्याची चांगली जोपासना करावी. त्याचा उपयोग करून त्याच जातींची शुध्दता व वैशिष्टये जतन करावीत. निवड पध्दतीनेच म्हशींमध्ये सुधारणा करणे शक्य आहे. त्यापासून मिळणा-या पिढ्यांची वाढ करणे फायद्याचे ठरते. जनावर व्याल्यावर २ महिन्याने वळू दाखवावा व विण्यापुर्वी एक ते दिड महिना जनावर भाकड करावे.

माजाची लक्षणे – बहुतांशी म्हशी सुर्योदयापुर्वी व सुर्यास्तानंतर माजावर येतात. म्हैस वारंवार लघवी करते, निरणाचे कातडीवर पांढरट क्षार दिसतात. माजावरील म्हशीचे निरण

सुजल्यासारखे दिसते. निरणाचा रंग जास्त काळसर व तेलकट दिसतो. म्हैस पान्हा चोरते, कास व सड ताठरलेले दिसतात. माजावरील म्हशींच्या पाठीवर थाप मारल्यास ती आपली शेपटी उंच उंचावते.

आहार व निगा –

क्षमतेएवढे दूध मिळणेसाठी सर्वासाधारणतः ४०० किलो वजन असलेल्या म्हशीस दररोज हिरवा चारा व ७ ते ८ किलो कोरडा चारा तिची भूक भागवणेसाठी व शरीर पोषणासाठी द्यावा. दूधनिर्मीतीसाठी, दररोजच्या एकूण दूध उत्पादनाच्या ५० ट्क्के खुराक द्यावा म्हणजे दुध उत्पादनाचे सातत्य टिकून राहील. प्रत्येक म्हशीला पिण्यासाठी ६० ते ७५ लिटर पाणी रोज लागते.

**गारपिटीनंतर घ्यावयाची काळजी** –

१) गारपीटीनंतर हवेत थंडावा निर्माण होतो. थंडीपासून फळबागेचे संरक्षण करणेसाठी त्याचदिवशी बागेस विहीरीचे पाणी देऊन हलके हलके ओलोत करावे.

२) द्राक्षे किंवा बोर बागेची फळगळ झाली असल्यास तात्काळ स्वच्छता करावी.

३) ऊस, ज्वारी पिकाची पड झाली असल्यास पीक बांधणी करावी.

४) बागेभोवती बांधावर काडीकच-याचे ढीक करून ते पेटवून शेकोट्या कराव्यात.

५) झाडाच्या खोडाभोवती व आळ्यात गवत, पालापाचोळा इ.चे जमिनीवर आच्छादन करावे.

६) थंड हवामानामुळे द्राक्षे पिकावर झॉन्थोमोनस करपा आणि केवडा रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते तेव्हा पिकावर प्रति जैविके आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या द्याव्यात. उदा. स्ट्रेप्टोसायक्लीन ५० ग्रॅम अधिक कॉपर ऑक्सीक्लोराईड १२५० ग्रॅम ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. त्यामुळे अणुजीवजन्य रोगापासून पिकांचे संरक्षण होईल.

७) द्राक्षावरील केवडा रोगासाठी रेडोमिल एम.झेड.७२ ची ०.४ (१०० लिटर पाण्यात ४०० ग्रॅम रेडोमिल एम.झेड.७२ या प्रमाणात) फवारणी करावी.

विशेष सुचना –

१) विविध पिकांच्या लागवडी संबंधी अद्ययावत शास्त्रीय माहिती शेतक-यांना व्हावी म्हणून श्रीसुगी व शेतकरी मासिकाचे जास्तीतजास्त वर्गणीदार करा. तसेंच महात्मा फुले विद्यापिठाने केलेली कृषि दर्शनी २००६ आपल्या माहितीसाठी संग्रही ठेवा.

२) दुरदर्शनवरील सोमवार ते शुक्रवार सायंकाळी ६.३० वाजता प्रक्षेपित केला जाणारा आमची माती आमची माणसे हा कार्यक्रम पाहा.

**कृषि विज्ञान केंद्र,**
**बारामती.**

……………………………………………..

**Field operations to be carried out in the month of February– (For Pune district)**

**Preseasonal Sugarcane**-

Provide the sugarcane crop with fourth dose of fertilizer @ 140 kg nitrogen,(300 kg urea), 85 kg phosphorus ( 530 kg S.S.P.) and 85 kg potash per hectare ( 140 kg muriate of potash) and then complete the earthing up operation.

**Suru sugarcane**-

Provide 6 to 8 week old suru sugarcane crop with 100 kg N per hectare (215 kg urea), second dose with neem cake in the ratio of 6:1 ( 6 kg urea and 1 kg neem cake). Provide the irrigations with an interval of 8 -10 days.

**Ratoon Sugarcane**-

Provide 2 months old ratoon sugarcane with 75 kg N per hectare (165 kg urea) as a second dose of nitrogen. In case of water scarcity, provide irrigation with alternate row irrigation method and makes use of mulches. Control of stem borer- Immediately after the incidence of stem borer spray the sugarcane crop with endosulphan 35% @ 15 ml mixed in 10 liters of water with an interval of 15 days carry out of 3 sprayings or make use of trichocards @ 3-4 trichocards per hectare at 40- 45 days after planting with an interval of 10 days for 6 times.

**Wheat-** -

Carry out harvesting of timely sown wheat in the evening hours.- Provide the irrigation to late sown wheat at the time of grain filling stage.Carry out timely harvesting of rabi crops like gram, sunflower, safflower, mustard, niger. Harvested crops should be threshed, exposed to sunlight and then properly stored.

**Summer groundnut-**

Keep crop weed free up to the age of 40-45 days by doing hoeing.Provide the crop with irrigations with an interval of 10-12 days considering soil condition. Care is taken that summer groundnut should not be water stressed from peg formation stage to the pod filling stage.To control the leaf roller spray the crop with 5% neem extract or cypermethrin 20 EC 4 ml or monocrotophos 36% 15ml or quinolphos 25 EC 20ml mixed in 10 liters of water alternatively carry out two sprayings with an interval of 15 days. Or carry out dusting of quinolphos 1.5 % powder or phoselon 4% powder or malathion 5% powder @ 20 kg per hectare.Leaf eating caterpillar- To control this pest spray the crop with 5% neem extract or SLNPV 250 EL or endosulphan 700 ml mixed in 500 liters of water.

**Summer sunflower-**

Provide the crop with second irrigation at 30-35 days after sowing at the time of flowering. Carry out intercultivation and keep field clean. Hairy caterpillar- To control this pest spray 250 to 500 LE SLNPV or endosulphan 1000 ml mixed in 500 liters of water in the evening hours.

**Summer green gram-**
Choose vaibhav, pusa vaishakhi, S-8, K.851, Phule M-2, BM-4.- Complete sowing in the first fortnight of March.- Treat the seeds with 2.5 gm carbendezim or captan before sowing.- After chemical treatment carry out seed treatment of rhizobium and phosphorus solubilizing bacteria.- Use 15 – 20 kg of seed per hectare. For that use 30 cm spaced double bowl seed drill. Carry out sowing on wapsa by wetting the soil.- At the time of sowing provide 25 kg N and 50 kg P per hectare with the help of double bowled seed drill.

**Mustard**-

To control powdery mildew on mustard dust the crop with 300 mesh sulphur powder @ 20 kg per hectare or wettable sulphur 80% 250 gm or carbendezim 100 gm mixed in 100 liters of water.Carry out harvesting of mustard according to the maturity.

**Irrigated cotton-** -

To cultivate cotton keep field ready by carrying out 22-25 cm deep ploughing, 2-3 harrowings and mixing 20 -25 bullock carts compost.- Choose LRH-5166 or JLH-168 varieties for irrigated cotton. Likewise for hybrid cultivars choose phule-492, NHH- 44, phule-388, Sankar-6 or Sankar-10.

Complete the sowing of irrigated cotton between 10 to 25th march.
To achieve good germination soak the seed for 6 hours. Likewise dip in 1% succinic acid for 6 hours. This helps for good and early germination.

- Use 8-10 kg seed of improved varieties and for hybrid varieties 2.5-3 kg.

- Spacing- heavy soil- 90 x 90-Improved varieties- 120 x 90- Treat the seed with azotobacter @ 250 gm for 10 kg of seed before sowing.

- Put 25 – 30 cart loads of farm yard manure or compost in the soil before sowing.

-Provide the irrigated cotton with 100 kg N, 50 kg P and 50 kg K per hectare. Out of that at the time of sowing apply 20 kg N ( 45 kg urea), total P( 315 kg SSP) and total K ( 85 kg Muriate of potash).

**Integrated pest management in cotton-**

In a village same variety should be sown. Seed should be treated with 10 gm emidachloprid per kg seed. Sowing of all the villagers should be completed at the same time.Provide the crop with half N and full dose of phosphorus and potash before sowing.Take mixed crop of maize and cowpea at the border of field. To get that one line of maize around the field should be planted. One seed of cowpea should be sown in between the two plants of maize.Sow one line of jawar or sesame between 9-10 lines of cotton to assemble birds.After attaining 60-65 days to the crop put 5 pheromone traps in the field of one hectare. If the adults of green caterpillar are trapped in this trap then release

parasite Trichogramma chilones @ 1.5 lac per hectare with an interval of 15 days for 2 times. Carry out spraying of neem extract 5% two to three times with an interval of 15 days for the control of spotted bollworm and American bollworm. To control american bollworm take a spray of 500 LE NHPV per hectare area. If the incidence of bollworm complex is exceeding 10% (10% of flowers, boll, bracts) then carry out spraying of any one of the following insecticide - 0.05% endosulphan or 0.2% carbaryl or 0.05% quinolphos.

**Summer bajara-**

Keep your plot weed free by giving 1-2 weeding up to the crop age of 30 days from the date of sowing.Provide the crop with second dose of nitrogen @ 45 kg per hectare (100 kg urea) at 25-30 days after sowing and then immediately irrigate the field.
Provide regular irrigation with an interval of 10-12 days considering the soil condition.

**Fruit crops-**

Protect newly planted fruit crops from sunlight by arranging shade. Remove out the excess growth beneath the grafted spot of newly planted fruit trees.

**Vegetables-**

If the sowing of cucurbitaceous crop is over then provide the crops with second dose of nitrogen @ 50 kg per hectare by placement method and provide irrigation immediately.If the sowing of summer vegetables like brinjal, tomoto, okra has been completed then provide the crops with second dose of nitrogen @ 50 kg per hectare by placement method and provide irrigation immediately.Complete the harvesting of onion crop if the 75% neck has drooped down. Three to four days after harvesting of onion carry out drying of onion bulbs along with leaves. Harvested onion bulbs should be arranged in such a way that the onion which is laid in first line will cover with the leaves of second line.
In this time of span the leaves will dry completely and total juice enters in onion. Outer layer of onion dries completely, it becomes thin, and wounds on onion heal completely. Onion starts leaving attached soil. Three to four days after drying of onion bulbs cut totally dried leaves by keeping 3-4 cm distance from onion bulb.Carry out grading of onion for storage.Make heap of graded onion under the tree shade and keep it there for 10-15 days.Then it is stored in storage house.

Storage house should be made sterilized by spraying insecticide( malathion and bavistin). To control the blight on brinjal, tomato, chilli spray the crop with dithane-M-45 @ 1250 gm mixed in 1000 liters of water.
In cucumber crop to increase the percentage of female flowers spray ethryl 250 PPM. Spraying should be done at 2 leaf and 4 leaf stage.

**Animal husbandry and dairying-**

Forage crops- To get the green fodder in summer for lactating animals take following forage crops considering the water availability.

Maize- Maize should be sown in between March to April. Spacing of 30 should be maintained in between two rows. Choose ganga safed-2, African tall, manjari composite varieties for fodder. Use 75 kg of seed per hectare area. Treat the seed with azotobacter before sowing.At the sowing provide the crop with 100 kg N, 50 kg P and 50 kg of K per hectare.Yield per hectare- 50-60 tonns of green fodder.

Jowar- Fodder jawar should be sown in between March to April. Spacing of 30 cm between rows should be maintained. For fodder jawar choose varieties like ruchira, phule amruta, maldandi, nilwa, M.P. chari, S.S.G.59-3. Use seed rate 40 kg per hectare for fodder jawar.Seed should be treated with azotobacter before sowing.Fertilizers- A dose of 80 kg P and 40 kg k should be given at the time sowing. Yield per hectare- 40 – 50 tonns of green fodder.

Bajara- Fodder bajara should be sown in between March to April. Spacing of 30 cm should be maintained between rows. Choose variety giant of fodder bajara. Use 10 kg of seed per hectare. Treat the seeds with azotobacter before sowing.Provide a dose of 60 kg N, 30 kg P per hectare at the time of sowing.Yield per hectare- 45-50 tonns of green fodder.

Cowpea- Fodder cowpea should be sown in between February to April. Spacing of 30 should be maintained between two rows. Choose varieties shweta, EC-4216, UPC-5286 for sowing. Use 40 kg of seed per hectare. Treat the seeds with rhizobium before sowing. A dose of 20 kg N, 60 kg p should be provided. Yield per hectare- 30 -35 tonn green fodder.